वाचले :

१) पत्र.क्र.साप्रवि/९/कावि/५४९/२०२४ दि-१९/०७/२०२४.

२) मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समिती,कामगार कल्याण विभाग यांचेकडील पत्र.क्र.काक/६/कावि/९९/२०२४ दि-०२/०८/२०२४.

३) आदेश.क्र.साप्रवि/९/कावि/६००/२०२४ दि-०२/०८/२०२४.

४) मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समिती,कामगार कल्याण विभाग यांचेकडील अहवाल क्र.काक/६/कावि/१३९/२०२४ दि-११/१०/२०२४.

५) मा.आयुक्त सो.यांचेकडील दि.१८ /१०/२०२४ रोजीचा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ०१८,सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/९/कावि/८८५ /२०२४
दिनांकः १८/१०/२०२४

विषय : सेवानिलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत..
**डॉ.बालाजी दत्तु धायगुडे,प्राध्यापक,सर्वसाधारण शल्यचिकित्सक.**

**आदेश,**

**ज्याअर्थी**, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील पदव्युत्तर संस्थेत **डॉ.बालाजी दत्तु धायगुडे** हे गट **'अ'** मधील **'प्राध्यापक,सर्वसाधारण शल्यचिकित्सक" या** पदावर कार्यरत आहेत.वैद्यकिय/आरोग्य सेवा ही महत्वपुर्ण सेवा असुन वैद्यकिय सेवेत कार्यरत कर्मचारी/अधिका-यांनी नेहमी दक्ष राहुन कार्यालयीन कर्तव्य जबाबदारीने पार पाडणे आवश्यक असुन आपले अधिनस्त कार्यरत महिला कर्मचा-याशी नेहमी सौहादपुर्वक व जबाबदारीने वागणे अभिप्रेत आहे.ज्याअर्थी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील **पदव्युत्तर विभागाच्या सर्जरी विभागात गंभीर स्वरुपाच्या indulges in sexually molesting female resident /alchohol parties with full support of HOD अशा प्रकारचे गैरवर्तन होत असल्याची बाब सोशल मिडियाद्वारे निदर्शनास आलेली आहे**

**आणि ज्याअर्थी**,उपरोक्त बाबीची प्राथमिक चौकशी करणेकरिता प्रस्तुतचे प्रकरण वाचले क्र १ अन्वये महिलांचे कामाचे ठिकाणी लैगिंक छळापासुन सरंक्षण (प्रतिबंध,मनाई,निवारण) अधिनियम २०१३ नुसार मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समितीकडे(विशाखा) पाठविणेत आलेले होते.समितीने वाचले क्र ४ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार व आजी व माजी विद्यार्थीनीने पीजी इन्स्टिट्युट यांनी दिलेल्या प्रत्यक्ष जबाबानुसार डॉ.धायगुडे हे पदाचा गैरवापर करुन कामाच्या ठिकाणी भितीदायक वातावरण,असभ्य,अर्वाच्च,लजास्स्पद,अपमानास्पद,शारीरीक ठेवणीबाबत आक्षेपार्ह टिप्पणी करणे,सभारंभात(गेट टुगेदर) दारु पिण्यास व डान्स करण्यास सक्ती करणे,प्रतिवादी हे युनिटमध्ये महिलांच्या शरीराकडे लज्जा उत्पन्न होईल असे बघणे,ओटीमध्ये गैरवर्तणुक करणे,सर्वासमोर शारीरीक अवयवांबद्दल असभ्य भाषेत बोलणे,अशा त्यांच्या गैरवर्तनावरुन डॉ.धायगुडे यांचा कामाच्या ठिकाणी महिलांकडे पाहण्यांचा दृष्टीकोण विकृत स्वरुपाचा असल्याचे दिसुन येत आहे.एकदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीत तथ्य असल्याचे निदर्शनास येत असल्याचा अंतिम निष्कर्ष महिला तक्रार निवारण समितीने नोंदवुन प्रतिवादी यांचेविरुध्द कठोर कारवाई करणेची शिफ़ारस केलेली आहे.

**आणि ज्याअर्थी, डॉ.बालाजी दत्तु धायगुडे,प्राध्यापक,सर्वसाधारण शल्यचिकित्सक** यांनी महिलांशी उपरोउल्लेखित नमुद गैरवर्तन करुन कार्यालयीन शिस्तीचा व नियमाचा भंग करीत असल्याची बाब सकृतदर्शनी निदर्शनास येत आहे. त्यांचे उदघृत गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर गंभीर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे.त्यांनी नेमुन दिलेल्या कर्तव्यात नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता न राखता,त्यांनी पदाचा दुरुपयोग करुन गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याची बाब स्पष्ट होत आहे.त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१) (एक)(दोन)(तीन) व कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिंक छळ (प्रतिबंध,मनाई,निवारण) अधिनियम २०१३ मधील अथांतर्गत तरतुदीचा भंग केल्याच्या निष्कर्षाप्रती मी आलेलो आहे.

**त्याअर्थी**,मी,आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,उदघृत अशोभनीय गैरवर्तन प्रकरणी, मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समितीचा अहवाल व त्यातील नमुद शिफ़ारशी,प्रकरणी त्याचेविरुध्द लैगिक सतावणुकीची सोशल मिडीयाद्वारे प्राप्त तक्रार विचारात घेता,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (१) व ५६(२) फ़ व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (१) (अ) चे अर्थांतर्गत तरतुदीनुसार,**डॉ.बालाजी दत्तु धायगुडे,प्राध्यापक,सर्वसाधारण शल्यचिकित्सक** यांना प्रस्तुत आदेशाचे **दिनांकापासून तात्काळ सेवानिलंबीत करण्यात येत असून**,त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यास मान्यता देत आहे.

निलंबन कालावधीत डॉ.बालाजी दत्तु धायगुडे. प्राध्यापक.सर्वसाधारण शल्यचिकित्सक यांना पुढील अटी व शर्तीच्या अधीन निर्वाह भत्ता अदा करण्यात येईल.

१) त्यांना सेवानिलंबनाचे पहिले ३ महिने कालावधीसाठी अर्धवेतनी रजेवर असतांना जितके रजा वेतन मिळाले असते त्या रजा वेतनाइतकी निर्वाहभत्त्याची रक्कम आणि त्या व्यतिरिक्त अशा रजा वेतनावर आधारित महागाई भत्ता व त्यावर आधारित अर्जित रजेच्या काळात अनुज्ञेय असलेले भत्ते त्या प्रमाणात उपजिविका भत्ता म्हणून देण्यात येईल.

२) सेवानिलंबन काळात त्यांना अन्य कोणत्याही ठिकाणी नोकरी अगर अन्य कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

३) दरमहा उदरनिर्वाह भत्ता मिळणेकामी त्यांनी अन्य कोणत्याही ठिकाणी सेवा,नोकरी, व्यवसाय केला नाही असा दाखला दरमहा २० तारखेच्या आत स्वत:च्या सहीने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्था येथे दिला पाहिजे, म्हणजे पुढील महिन्याचे एक तारखेस त्यांना उदरनिर्वाह भत्ता देण्यात येईल.

४) दर महिन्याचे २० तारखेपर्यंत दाखला हजर न केल्यास उदरनिर्वाह भत्ता अदा केला जाणार नाही व भत्ता अदा करणेस विलंब झाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

५) सेवानिलंबन काळात त्यांनी कार्यालयात अगर कार्यालयाचे आवारात गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास ते त्यांचे गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन समजण्यात येऊन त्याबाबत त्यांचेविरुध्द पुढील शिस्तभंगविषयक कारवाई अलहिंदा केली जाईल.

६) निलंबन काळात त्यांचे मुख्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकिय विभाग व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्था असे राहील. त्यांना वरिष्ठांचे परवानगीशिवाय मुख्यालय सोडून जाता येणार नाही.

७) प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

( शेखर सिंह )
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रति,

**१.डॉ.बालाजी दत्तु धायगुडे, प्राध्यापक,सर्वसाधारण शल्यचिकित्सक**
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्था.

प्रत,

**१.अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्था**

२/- प्रस्तुत आदेश **डॉ.बालाजी दत्तु धायगुडे, प्राध्यापक,सर्वसाधारण शल्यचिकित्सक** यांना तात्काळ बजाविणेत येवुन, त्यांचेविरुध्द १५ दिवसांत दोषारोपपत्र ठेवण्याची कार्यवाही करावी. प्रकरणी विलंब झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (क) चे अर्थांतर्गत तरतुदीनुसार नियमाधिन प्रशासकिय कार्यवाही करणेत येईल.

२.सामान्य प्रशासन टेबल क्र १,१२,२२,सामान्य प्रशासन संगणक कक्ष.

३.वैद्यकिय मुख्य कार्यालय.

४.कामगार कल्याण विभाग.(मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समिती)

H:\SS\2024\डॉ.बालाजी धायगुडे.doc4